# फुलदाणी

म. ग्रं सं ठाणें.
विषय काव्य
सं. क्र. 692



REFBK-0005622

नरहर विष्णु फडके,
यवत ( जि०पुणें )

किंमत ६ आणे.

# फुलदाणी

( कवितासंग्रह )

REFBK-0005622
REFBK-0005622

प्रस्तावना–

प्रो० के० ना० वाटवे, एम्. ए.

स० प० कॉलेज, पुणे.

५६२२

लेखक–

**नरहर विष्णु फडके.**

वैशाख १८५९, सन १९३७

किंमत ६ आणे.

प्रकाशक—
नरहर विष्णु फडके,
यवत स्टेशन, ( जि० पुणें. )

( सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन. )

मुद्रक-
श्री० दा० सातवळेकर,
भारत-मुद्रणालय,
औन्ध, ( जि० सातारा. )

# ‘फुलदाणीं’तल्या फुलांचा

# थोडासा सुगंध

आधुनिक मराठी कविता म्हटली कीं, तिचे कांही ठळक विशेष आपल्या डोळ्यांपुढें उभे राहतात. रूढींवर हल्ले, प्रेमाची आठवण, इत्यादि ठराविक अंतरंगानें नटलेली व नव्या गेय जातींच्या बाह्यांगानें शोभणारी ती असावयाची. जुनीं वृत्तें किंवा छंद व जुनी विचारसरणी यांचा जीर्णोद्धार कधीकाळीं तिच्यामध्यें झालाच, तर तो विडंबनद्वारा व्हावयाचा. म्हणजें मनाच्या श्लोकांचा उल्लेख किंवा सात्त्विक राहणी यांसारख्या गोष्टींचा उपयोग थट्टा करण्याकडेच बहुतकरून व्हावयाचा; पण आधुनिक कविता म्हणजे सर्वच वरील ठशाचें लिखाण नव्हे. आधुनिक काळांत रहात असून व नवीन परिस्थितीशीं झगडत असतांनाहि जुन्या वळणाची छाप ज्यांच्यावर त्याच्या योग्य गुणांमुळे कायम राहते, अशींहि कांहीं संस्कारक्षम मनें समाजांत असूं शकतात.

सगळा जुना जमाना एकदम उखडून जाऊन त्या जागीं नव्याचें साम्राज्य चुटकीसारखें प्रस्थापित होत नाहीं. जुन्या राजवटीचे एकनिष्ठ भक्त नव्या कारकिर्दीतहि दिसून येतातच व अशी नव्याजुन्याची घसण पडतां पडतां झालेला बदल ध्यानांत न येतां समाजाच्या अंगवळणीं पडतो. भर ऊन संपून दाट अंधार एकदम पडेल, किंवा घन निशेंतून एकदम कडक माध्यान्ह जन्माला येईल, तर हा फरक जनतेला मानवणार नाहीं.

तीच गोष्ट विचारसरणीचीहि आहे. जुन्याची आवड व त्यांतील योग्य त्या अनुकरणीय गुणांबद्दलचा अभिमान एकदम नष्ट होऊन न पारखलेलें नवें लोक घेऊं लागले तरी तें समाजस्थैर्याच्या दृष्टीनें वाईटच. बदल हा एक हळूहळू तरी घडून येईल, नाहींतर अजिबात घडून येणारच नाहीं; या अर्थाचें एक इंग्रजी वाक्य आहे, त्याचा अर्थ हाच आहे. हे विचार सुचण्याचें

कारण वाचकांसमोर असलेली रा० न० वि० फडके यांची 'फुलदाणी.' ही फुलदाणी आधुनिक काळांतच रा० फडके या तरुण कवींनी सिद्ध केली आहे. हींत वेचलेलीं फुलें आधुनिक विचारोद्यानांतलींच आहेत. पण त्यांचा रंग व सुगन्ध मात्र जुन्या काव्यांतील कांहीं रमणीय व चिरस्थायी विशेषांची सुखदायक आठवण करून देणारा आहे.

ललित-वाङ्मयावरून त्याच्या कर्त्याच्या मनाची पारख करण्याची वहिवाट आहे व ललित-वाङ्मय निर्माण करण्याच्या वेळच्या लेखकाच्या मनःस्थितीवरून ती अगदीं चुकीची ठरेल, असें समजण्याचें कारण नाहीं. "फुलदाणी" काव्यावरून रा० फडके यांची मनोवृत्ति कोणासहि झटकन् ओळखतां येईल, इतकें तिचें प्रतिबिंब तंतोतंत त्यांच्या काव्यांत पडलें आहे. त्यांत रा. फडके हे एक अत्यंत सात्त्विक, कोमल मनाचे व भले तरुण दिसतात. त्यांना जुन्या विचारसरणीचा व आचार-विचारांचा योग्य तो अभिमान आहे; त्याचबरोबर जुन्यांतील त्याज्यांश व नव्यांतील ग्राह्यांश यांतील विवेक मात्र त्यांच्या बुद्धींत सदैव जागा आहे. 'तोड ही रूढिची बेडी,' 'तरुणास,' 'हरिजनांचा प्रश्न' इत्यादि कवितांत त्यांनीं जुन्यावर व 'नवी नीति' इत्यादि कवितांतून नव्यावर निर्भीडपणें हल्ला चढविण्यास कांहीं कमी केलेलें नाही.

तसेंच सूर्यनमस्कार, सात्त्विक आहार, निष्कर्जी राहणी, यांवर त्यांनीं योग्य तो भर देऊन त्याऐवजीं हल्लीं बोकाळलेल्या बेछूट वृत्तीचें नाजूकपणें आविष्करण केलें आहे. रा० फडके यांचें मन जुन्या वळणाच्या सात्त्विक व आनंदी कुटुंबांत रंगून गेलेलें दिसतें. त्यांतील गृहिणी साधी, सिनेमा-नाटकांची व छानछुकीची हौस धरून पतीस खर्चाच्या पेचांत न पाडणारी व असेल त्यांत समाधान मानणारी आहे. त्यांतील मुलें शिस्तीनें वागणारीं, सकाळीं शुचिर्भूत होऊन सूर्यनमस्कार घालून दुधाच्या लोटया झोकून अभ्यासास लागणारीं आज्ञाधारक बालकें आहेत. बहिण-भावंडांत गंमत व थट्टामस्करी चाललेली आहे. कोणी लहान बालकें दुकानाचा खेळ, तर कोणी बाहुलीचीं लग्नें लावीत आहेत. कोठें माता प्रेमळपणें आपल्या तान्हुल्याशीं वात्सल्यरसांत

तरगंत आहे, तर कोठें भुकेलेलें बालक मातेस जेऊं घालण्याबद्दल हांक मारीत आहे. खुद्द घरधनी मोठें प्रेमळ व विनोदी असून सर्वांचे व्यवहार मार्मिकपणें अवलोकन करून या सात्त्विक संसारांत आनंद मानणारे आहेत. त्यांस स्त्रीदाक्षिण्याचे भलते फंद आवडत नाहींत. ते ईश्वरावर निष्ठा ठेवणारे, रामदासादि साधुसंतांच्या वचनांवर अढळ विश्वास ठेवणारे, एक विवेकी सद्‌गृहस्थ आहेत. या कौटुंबिक चित्रांत काय वावगें आहे ? तें त्याच्या साधेपणामुळें व निर्व्याजतेनेंच मनोरम दिसतें.

विचारसरणीप्रमाणें रा० फडके यांच्या काव्याची भाषाहि अत्यंत साधी आहे. तीवर समर्थ रामदासांची छाप पडलेली आहे. नवीन चालीचीहि कांही कविता सदर संग्रहांत आहे. बरीच कविता हल्लीं गणपतीचे उत्सवांत मेळ्यासाठीं केल्या जाणाऱ्या कवितेच्या थाटाची आहे. त्यांतील ' जलबिंदूचा प्रवास ' ही कविता काव्यदृष्टया इतरांहून बरीच वरच्या दर्जाची वाटते. कल्पनेच्या उंच उंच भराऱ्या, शब्दांचे मनोरे, त्वेषाचे वाग्बाण, लागट व घावडावाचा विनोद वगैरे गोष्टी रा० फडके यांच्या कवितेंत नाहींत. सर्व आपला साधा, सात्त्विक व भलेपणाचा कारभार; पण त्यांच्या या साधेपणांतच एक प्रकारची मौज आहे व तीमुळेंच एक प्रकारचें समाधान वाटतें.

रा० फडके यांचें लक्ष गत इतिहासाकडे व आधुनिक काळाकडेहि सारखेंच असून याहि बाबतींत त्यांचे विचार बाणेदार, पण सनदशीर विचार-पद्धतीच्या गृहस्थाला शोभण्यासारखे आहेत. रा० फडके यांनीं व्यासंग ठेवला तर ते यापुढे चांगली कविता करूं शकतील, इतकी शक्तिगर्भता त्यांचेमध्यें खास आहे. सदर काव्यसंग्रह विशेषत: लहान व तरुण मुलांमुलींच्या हातांत द्यावयास योग्य आहे. हल्लींच्या काळीं असलें सात्त्विक व प्रसादपूर्ण काव्य लिहिल्याबद्दल वाचकवर्ग रा० फडके यांचें अभिनन्दन करील, असा भरंवसा वाटतो.

योगकुञ्ज, चिमणबाग,<br>टिळकरोड, पुणें, नं. २<br>ता. २३-३-३७ } के० ना० वाटवे.

# आत्म-निवेदन

ललित-वाङ्मयाचा उगम बहुधा करमणुकीखातरच होतो. मनुष्यास नेहमीं प्राप्त परिस्थिति कंटाळवाणी वाटते व ती सोडणें तर शक्य व इष्टही नसतें. तेव्हां ललित-वाङ्मयाच्या कल्पित व निराळ्या परिस्थितीत मनास नेऊन निराळ्या जगाचा अनुभव घेणें, यांत मानवास समाधान वाटतें. ललित-वाङ्मयाचा हाच मुख्य हेतू आहे. प्रत्येक ललित कृतींत बोध सांपडावा, अशी पुष्कळांची अपेक्षा असते व त्या दृष्टीनें पाहणारांस ज्यांत बोध नाही, तें ललित-वाङ्मय टाकाऊ वाटतें. पण बोध करणें हें ललित-वाङ्मयाचें मुख्य कार्य नसून गौण कार्य फार तर म्हणतां येईल. वाचकांचें मन निराळ्या जगांत नेऊन त्यांस प्राप्त परिस्थितीचा क्षणभर का होईना, पण विसर पडावा, हा अशा वाङ्मयाचा मुख्य हेतु आहे.

करमणूक होतां होतां जर बोध मिळत गेला तर केव्हांहि उत्तमच. परन्तु वाङ्मयामुळे मनुष्याचा अधःपात होतां कामा नये. प्रत्येक घरास शौचकूप ( किंवा जुनी म्हण- ' गांव तिथें महारवाडा ') असतोच ; पण कोणी पाहुणा आल्यास घराचीं निरनिराळीं दालनें न दाखवितां शौचकूपच त्यास दाखविणें अनुचित होय किंवा दिवाणखाने वगैरेंचें वर्णन करावयाचें सोडून शौचकूपाचेंच वर्णन करीत बसणें म्हणजे मूर्खपणाचें होय. सरस्वती व्यासपीठावर बसली नसून ती प्रमत्त अशा मयूरसिंहासनावर विराजमान आहे हें खरें; परन्तु तिने गर्दभ अगर वराह वाहन स्वीकारलेलें नाहीं ! घराला शौचकूप असतो, म्हणून देवतामंदिरांना कोणी शौचकूप बांधीत नाहींत. अश्लील वाङ्मय निर्माण करणें म्हणजे देवता-मंदिरास शौचकूप बांधण्यासारखेंच आहे. ललित-वाङ्मयांतून बोध न मिळो बिचारा, न मिळेल; तरी पण करमणुकीच्या नांवाखालीं अधःपात होऊं नये. करमणूक होतां होतां बोध मिळेल तर दुधांत साखर पडल्याप्रमाणें 'अधिकस्याधिकं फलं'

या दृष्टीनें सहज करमणुकीखातर व जमल्यास बोधप्रद कविता व गोष्टी लिहिण्याचा नाद लागला; कारण हें खेडेगांव असल्यानें दुसरीं करमणुकीचीं साधनें मिळत नाहींत व पदरखर्चानें वाङ्मय विकत घेण्याइतकी परिस्थिति नाहीं; यामुळें जवळजवळ निरुपाय म्हणून या नादास लागलों व केलेल्या वाङ्मयकृतींना निरनिराळ्या मासिकांच्या संपादकांनीं प्रसिद्धि देऊन प्रोत्साहन दिलें; त्यामुळें ही फुलदाणी भरण्याचा योग जमून आला. त्या मासिकांच्या संपादकांचा व पुस्तक काढण्यास ज्यांनीं प्रोत्साहन दिलें, त्या मित्रांचा अत्यंत आभारी आहें. एकूण ६५-७० फुलांतून सुमारें पन्नास पुष्पें प्रकाशित झालीं व त्यांतील चाळीस पुष्पें या फुलदाणींत भरून रसिकापुढें ठेवण्याचें साहस करीत आहें. नाना तऱ्हेचें वाङ्मय वाचण्याची सोय नसल्यामुळें भाषेंत सौंदर्य आणतां येत नाहीं. वाचकांनी या कृतीचा योग्य परामर्ष घेतल्यास अशीच अल्पस्वल्प साहित्यसेवा करण्यास मला हुरूप येणार आहे. यांतील बरींच पुष्पें माझ्या बालमित्रांस आवडतील व त्यांची करमणूक करतील, असा मला भरंवसा आहे. रसिकांवर हल्लींच्या बिकट आर्थिक परिस्थितींत जास्त बोजा पडूं नये म्हणून किंमत शक्य तों कमी ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. हें काम थोड्या मुदतींत, अल्प दरांत, सुबक व शुद्ध करून दिल्याबद्दल भारत-मुद्रणालयाच्या चालकांचाहि आभारी आहें.

शेवटीं थोड्याशा ओळखीवरून जास्त परिचय नसतां, अनेक तऱ्हेचे व्याप मागें असतांहि, वेळांत वेळ काढून समग्र कविता वाचून आरंभींची गुणोत्कर्षदर्शक प्रस्तावना लिहून दिल्याबद्दल श्री० के० ना० वाटवे यांचे, तशी थोडी सुद्धां अपेक्षा नसतांहि, आभार मानणें माझें कर्तव्यच आहे.

यवत स्टेशन,
जि० पुणें.
वैशाख शु. १५
शके १८५९

सर्वांचा कृपाभिलाषी

न० वि० फडके.

माझ्या जीवनाची पवित्र स्फूर्तिदेवता
माझी परमप्रिय पत्नी

**सौ० कमला**

हिला अर्पण.

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | खायाला मजला देई | १ |
| २ | स्फूर्तिदेवतेस | ३ |
| ३ | मागणें | ४ |
| ४ | नमस्कार घालूं चला सूर्यराया | ५ |
| ५ | मज्जन्माचें साफल्य | ७ |
| ६ | छकुल्यास— | ८ |
| ७ | लागूंया कामास | ९ |
| ८ | असून अडचण— | १० |
| ९ | खरा विष्णुभक्त | ११ |
| १० | श्रीशिवछत्रपति-गर्वपरिहार | १२ |
| ११ | तोड ही रूढिची बेडी | १४ |
| १२ | नवी नीति | १५ |
| १३ | ऊठ बालका ! | १७ |
| १४ | बाळ आणि फुलपाखरूं | १९ |
| १५ | हरिजनांचा प्रश्न | २१ |
| १६ | सांत्वन | २३ |
| १७ | भाऊगर्दी | २४ |
| १८ | तरुणास- | २६ |
| १९ | मातेची मार्गप्रतीक्षा | २७ |

| | | |
|---|---|---|
| २० | ताईची फजिती | २९ |
| २१ | छोटूचें दुकान | ३० |
| २२ | मुलास उपदेश | ३२ |
| २३ | सैनिकाचें स्वप्न | ३३ |
| २४ | आधुनिक सुशिक्षित | ३६ |
| २५ | ईशपूजा | ३८ |
| २६ | मकरन्द | ३९ |
| २७ | बालिकेस– | ४० |
| २८ | चमेलीचें लग्न | ४१ |
| २९ | नूतन वधूवरांस आहेर | ४३ |
| ३० | माझी सायकल | ४४ |
| ३१ | मित्राचें स्वागत | ४६ |
| ३२ | कवि आणि भ्रमर | ४७ |
| ३३ | बागेंत जाऊंया | ४९ |
| ३४ | बालचन्द्र | ५१ |
| ३५ | एका दलबिंदूचा प्रवास | ५३ |
| ३६ | ईश्वराची योजना | ५९ |
| ३७ | स्त्री–दाक्षिण्य | ६१ |
| ३८ | खेळूं मैदानीं | ६४ |
| ३९ | दिपवूं या जगता | ६५ |
| ४० | श्रीरामचंद्राचें धोरण | ६७ |

# फुलदाणी





# फुलदाणी

— १ —

## ‘ खायाला मजला देई ’

आई, आई । खायाला मजला देई ॥ ध्रु० ॥

भूक लागली बहूत मजला
फार वेळ मी मागे तुजला
केव्हा देशिल सांगे मजला
आई, आई । खायाला मजला देई ॥ १ ॥

फुलदाणी

सकाळि उठुनी तोंडहि धुतलें
देवाजीतें भावें नमिलें
बाबासंगें स्नानहि केलें
आई, आई। खायाला मजला देई ॥ २ ॥

पाटीवरचा धडाहि केला
तीन-चारचा पाढा लिहिला
'काकांचा' तो 'धडा' वाचला
आई, आई। खायाला मजला देई ॥ ३ ॥

दादासंगें देवा गेलों
नमस्कारही घालुनि दमलों
चालुनि हिंडुनि फारचि थकलों
आई, आई। खायाला मजला देई ॥ ४ ॥

दमही आतां मज धरवेना
तुझें कामही तें संपेना
काम सोडुनी खाया दे ना
आई, आई। खायाला मजला देई ॥ ५ ॥

— २ —

# स्फूर्ति--देवतेस–

संसारगिरी हा मोठा । तुजसंगें जाइन चढुनी
असतां तूं माझ्याजवळी । उत्साहें जातों भरुनी
चल जाऊं एकदिलानें । हाताला बळकट धरुनी
कोसळोत नाना दुःखें
बोचोत भयंकर कांटे
आकाश जरी हें फाटे
तरि नाहीं मजला फिकिर । जवळी तूं द्याया धीर ॥ १ ॥

काळोख भिन्न होऊनी । जरि तुफान वारा उठला
मेघही कोसळुनि खालीं । थैमान विजेनें केला
त्या वेळीं वाट चुकोनी । खोल हा कडा जरि आला
श्वापदें दाखवुनि भीती
आरोळया मोठया देती
देवता परी स्फूर्तीची
असतां तूं जवळी प्यार । वाटे न मजसि दरकार ॥ २ ॥

— ३ —

# मागणें

देइ ईशा, तूं मला चार गोष्टी
नसे आशा आणखी फार मोठी
प्रथम देई आरोग्य मला देवा,
असे मोठा जो जगीं खरा ठेवा ॥ १ ॥

कवडि कोणाची नसो मला देणें
कर्ज काढोनी ऋणाईत होणें
दुजा देई वर हाच मला ईशा,
कर्ज घेण्याची नसो मला इच्छा ॥ २ ॥

दुष्ट व्यसनें हीं मोहिती जगास
तनू-वित्ताची करिति हानि खास
कदा आहारीं त्यांचिया न जावें
प्रभो, इच्छी वर हाच तिजा भावें ॥ ३ ॥

असो गृहिणी मम शांत सदा तुष्ट
सदा आनंदी, नसो कदा रुष्ट
प्रेम राहो सर्वदा उभयतांचें
देइ चवथा वर प्रभो, हाच मातें ॥ ४ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

— ४ —

## नमस्कार घालूं चला सूर्यराया

प्रभातीं उठोनी शुचिर्भूत होऊं
मुदें भीम-व्यायाम-देवासि ध्याऊं
सुखाचें जिणें प्राप्त व्हाया जगीं या
नमस्कार घालूं चला सूर्यराया ॥ १ ॥

नमस्कार झालाचि व्यायाम-राजा
जगीं कोणि नाहीं तयासाम्य दूजा
तनू पुष्ट व्हाया अतां नेम पाळूं
मुदें सूर्यराया नमस्कार घालूं ॥ २ ॥

विनाखर्चि सोपे नमस्कार घालूं
परी दोष पापें भवदुःख जाळूं
अतां नेम पाळूं मनें सुष्टवाया
नमस्कार घालूं चला सूर्यराया ॥ ३ ॥

सुबुद्धीसि दाता महद्दुःखहर्ता
अनन्यास त्राता हरीप्रेमदाता

जगीं जाहला हा नमस्कार पूर्ण
नमस्कार घालूनि होऊंच धन्य ॥ ४ ॥

स्वराज्यप्रदा शिस्त ही अंगिं येई
नका शीण घेऊं अनेकीं उपायीं
मुलांनो, मुलींनो, उठा व्हा तयार
नमस्कार व्यायाम घ्याया हुषार ॥ ५ ॥

पुरे यास जागाहि अत्यंत थोडी
मुलांचा बहू वेळही हा न मोडी
असा हा नमस्कार व्यायाम श्रेष्ठ
करूं या चला, सोडुं आलस्य नष्ट ॥ ६ ॥

स्त्रियांनीं मुलींनीं मुलांनीं जनांनीं
सुखानें करावा घरीं जो उठोनी
असे हा नमस्कार व्यायाम श्रेष्ठ
जनां दाविला श्रीसमर्थेंचि स्पष्ट ॥ ७ ॥

नमस्कार घालूं रवीसी अपार
रमूं रामनामीं करूं या प्रसार
हराया अधर्मा अतां नेम पाळूं
रवीतें स्तवोनी नमस्कार घालूं ॥ ८ ॥

— —

— ५ —

# मज्जन्माचें साफल्य

साधू, कवी, भजक, शास्त्रिपुराणिकादी
धर्मार्थ कष्ट करिती त्यजिती सुखादी
त्यांची उदार करणी समजेल जेव्हां
मज्जन्म हा सफल होइल जाण तेव्हां ॥ १ ॥

मद्देह हा करिल कार्य तयां स्मरोनी
त्यांच्यापरी तनुमनें स्वसुखें त्यजोनी
अंतीं पडेल जड देह स्वधर्मकार्यीं
मज्जन्म हा सफल होइल त्याच कालीं ॥ २ ॥

देशार्थ देह त्यजुनी जयिं यज्ञ केला
देशार्थ दान दिधलें जयिं सम्पदेला
त्यांतें स्मरोनि जधिं देह करीं तसाच
मज्जन्म हा सफल होइल जाण साच ॥ ३ ॥

सेवार्थ आयु जनतेसचि वाहियेलें
स्वातंत्र्य साध्य करण्या जयिं कष्ट केले
त्यांच्यापरी करिन कार्य जधीं सुखानें
मज्जन्म हा सफल होइल खास जाणें ॥ ४ ॥

चक्रांकित ध्वज उभा विलसे तिरंगी
पाहोनि शत्रु भयभीतचि अंतरंगीं
मत्प्राणसंकट पडे जधिं रक्षण्याला
मज्जन्म हा सफल होइल त्याच काला ॥ ५ ॥

— ६ —

# छकुल्यास--

( सकाळीं न्हावयास घालून निजवितांना- )

नीज नीज माझ्या छकुल्या, झोंप अतां घेइ रे ॥ ध्रु० ॥
फार काम आहे मजसी
दिवस किती येई वरती
रडुन नको अडवूं मजसी
नीज सोनुल्या रे ॥ १ ॥

पहाटेस जागा होसी
कामाला जाउं न देशी
अंगाला बिलगुन निजशी
कोण करिल काम रे ? ॥ २ ॥

फार खेळलासी बाळा,
लावुं नको आता चाळा
नीज नीज रे वेल्हाळा,
उशिर जाहला रे ॥ ३ ॥

घेइ झोंप गाणें म्हणतें
पाळण्यांत झोका देतें
अंकीं वा तुज थोपटितें
काय करूं सांग रे ? ॥ ४ ॥

---

— ७ —

# लागूंया कामास

गड्यांनो, लागूंया कामास ॥ ध्रु० ॥

दीनदयाघन भक्तवत्सला,
सन्मति देई, दावि पथाला
हिंदजननिच्या कंठीं वसला
परवशतेचा फांस ॥ १ ॥

देशासाठी देह झिजविती
समाजक्रांती करण्या झटती
रूढाचारा धक्के देती
साह्य करूंया त्यांस ॥ २ ॥

दुष्ट रूढिंनीं 'धर्म' लोपला
समाज दुबळा होउनि गेला
नव्या युगीं तो मागें पडला
चेतन देऊं त्यास ॥ ३ ॥

गतेतिहासा विसरुनि जाऊं
दुबळेपण हें टाकुनि देऊं
तनु-मन-धन निज उद्यमिं लावूं
सोडूं विघ्न-भयास ॥ ४ ॥

विघ्नभयानें स्वकर्म त्यजती
त्यांची होते जगतीं फजिती
निंदा, स्तुति वा समान गणिती
श्री-यश वरितें त्यांस ॥ ५ ॥

———

[library stamp]

— ९ —

# खरा विष्णुभक्त

( ‘ वैष्णव जन ’ तो या पदाचा भावार्थ )

सदा जाणतो त्रास पीडा पराची
परांच्या हिता दक्षताही तयाची
अहंकार त्याचा मुळीं ना तयास
असा वर्ततो साच तो विष्णुभक्त ॥ १ ॥

जनांशीं सदा वागतो नम्र भावें
न निंदी कुणा शांत राही स्वभावें
असें वाणि-काया-मनानेंहि शुद्ध
असा वर्ततो साच तो विष्णुभक्त ॥ २ ॥

असे वागणें सर्वभूतीं समान
जयें जिंकिला लोभ वा मोह पूर्ण
परस्त्रीसि मातेपरी मान देत
असा वर्ततो साच तो विष्णुभक्त ॥ ३ ॥

जयाच्या मनीं प्राप्त वैराग्य पूर्ण
सदा मग्न जो चिंतनीं रामनाम
नसे राग वा त्यासि इच्छाहि दुष्ट
तया दर्शनें लोक होती पवित्र ॥ ४ ॥

— ८ —

# ' असून अडचण... '

१ फलानें लवला वृक्ष रसाळ बहु गोमटीं
किडीनें खादलीं सारीं कोण संतोष पावती ?
२ धनानें भरली कोठी वाडाही भव्य बांधला
याचकां दान देण्याची इच्छा ना परि त्याजला
३ संतती जाहली खूप पोशिली कष्ट साहुनी
वार्धकीं सुख ना देती ताडिती कटु बोलुनी
४ रूपयौवनसंपन्ना गुणवान् पति लाभली
परस्त्रियांकडे ओढ तयाची परि लागली
५ ग्रंथांनी भरली पेटी मुळीं ना वाचितो कधीं
देईना वाचण्या कोणा झुरळें जरि भक्षिती
६ आप्तमित्र जमा होती सुखाचे दिन पाहुनी
उरेना एकही खालीं कष्टाचे क्षण देखुनी
७ शतायू लाभलें पूर्ण संपत्ती शक्ति लाभली
सौख्य ना दिधलें कोणां दुबळीं व्यर्थ गांजिलीं
८ जलानें भरला पूर्ण छायाही दाट भोंवतीं
तडागीं राहती नक्र पांथ येतांच भक्षिती
९ विद्याही शिकला खूप मोठा पंडित जाहला
शिष्यांना ज्ञान देण्याची इच्छा ना परि त्याजला
१० असोनी होतसे तोटा गोष्टी या जगतीं किती
सूज्ञांना नलगे फार सांगणें सर्व जाणती

———

— ९ —

# खरा विष्णुभक्त

( ' वैष्णव जन ' तो या पदाचा भावार्थ )

सदा जाणतो त्रास पीडा पराची
परांच्या हिता दक्षताही तयाची
अहंकार त्याचा मुळीं ना तयास
असा वर्ततो साच तो विष्णुभक्त ॥ १ ॥

जनांशीं सदा वागतो नम्र भावें
न निंदी कुणा शांत राही स्वभावें
असे वाणि-काया-मनानेंहि शुद्ध
असा वर्ततो साच तो विष्णुभक्त ॥ २ ॥

असे वागणें सर्वभूतीं समान
जयें जिंकिला लोभ वा मोह पूर्ण
परस्त्रीसि मातेपरी मान देत
असा वर्ततो साच तो विष्णुभक्त ॥ ३ ॥

जयाच्या मनीं प्राप्त वैराग्य पूर्ण
सदा मग्न जो चिंतनीं रामनाम
नसे राग वा त्यासि इच्छाहि दुष्ट
तया दर्शनें लोक होती पवित्र ॥ ४ ॥

नों. नं. ६६३

— १० —

# श्रीशिवछत्रपति-गर्वपरिहार

बांधितो नवा गड भूप । वार्ता ही ऐकुनि चित्तीं
होतसे मोद सकलांना । ' कामाला जाऊं ' म्हणती
उत्साहें सारे मिळुनी । रायाच्या सन्निध जमती
भेटतां राय शिवबाला
' कामाला लागा ' वदला
' उठवुनि द्या अवघड किल्ला
शत्रूला जाइ न हार । तुम्ही मर्द मावळे प्यार ' ॥ १ ॥

उत्साहें कामें करिती । ते शूर मावळे वीर
राजास्तव झटती सारे । शिवबा तो त्यांचा प्यार
देहाची फिकिर न कोणा । उद्योगीं झाले चूर
शिवराय राहुनी जवळी
अवलोकी कामें सगळीं
तों दर्पकल्पना आली
शिवराय मनामधिं ठाण । मांडुनी घालि थैमान ॥ २ ॥

' हे गरिब मावळे मजुर । माझ्यास्तव झटती सारे
पोषिता तयांचा मीच । अन्नावर माझ्या जगले
या उभ्या महाराष्ट्रांत । किति सत्ता माझी चाले
मी एक शब्द जरि बोलें
सारें दळ सत्वर हालें
सत्ता न कुणाची चाले
माझ्याविण दुसरी आतां । जाहलों जिवांचा भर्ता ' ॥ ३ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
नं. ........ नं. ........
प्रा. ........



प्रभुरामनाम-जयघोषें । श्रीसमर्थस्वारी आली
तात्काळ वंदिलें त्यांना । शिवरायें जाउनि जवळी
क्षेमकुशल पुसतां श्रीनां । शिवदर्पभावना कळली

शिवप्रभू गर्व हा वाही
कीं ‘ जनां अन्न मी देई ’
गर्वभार विलया नेई

म्हणुनि अता सावध केला । पाहिजे राय शिवबाला ॥ ४ ॥

मनिं विचार करुनी स्वामी । बोलती राय शिवबास
‘ शिवबा, हा फोडूं खडक । बोलवी योग्य मजुरास ’
गुरु-आज्ञा म्हणुनी रायें । कारण ना पुशिलें त्यांस

मारुनी हाक मजुराला
गुरु-आज्ञा सांगे त्याला
बहु अगाध प्रभुची लीला

फोडितां खडक पोटांत । बेडकी निघाली एक ॥ ५ ॥

‘ शिवबा, ही आली कुठुनी ? पाणी हें कोणीं दिधलें ?
जीव हा जगविला कोणी ? ’ श्रीसमर्थ स्वामी वदले
‘ श्रीराम जगाचा कर्ता । त्यानेंच सकल पोषीलें

मनुजास शक्य हें काय ? ’
होतसे खजिल शिवराय
धांवुनियां धरिले पाय

‘अपराधा उदरीं घाला । गर्व मी मानसीं धरिला’ ॥ ६ ॥

— ११ —

# तोड ही रूढिची बेडी

बघसि काय वेड्यावाणी ? तोडि शृंखला रे
रूढीच्या भाराखालीं धर्म लोपला रे ॥ ध्रु० ॥

साप साप म्हणुनी दोरी
धोपटिसी भूमी सारी
व्यर्थ जरी शिणसी भारी
दोष इथें सांग रे ॥ १ ॥

पतितांचें लागे पाप
विधवांचा बाधे शाप
देत अस्पृश्यता ताप
बोध अतां घेइं रे ॥ २ ॥

धर्म सत्य हाची असतां
परका कां मारी लाथा ?
देश भोगितो कां दुःखां ?
रूढि करित खेळ रे ॥ ३ ॥

धर्माच्या नांवाखालीं
धिंगाणा रूढी घाली
म्हणुनि कळा ऐशी आली
तोडि हिचा पाश रे ॥ ४ ॥

विश्वविजयि अपुला धर्म
असुनि दुःख देई परम
रूढि हीच जाणे वर्म
बेडि हिची तोड रे ॥ ५ ॥

— १२ —

# नवी नीति

नीति ही कसली ? । दुर्बुद्धि अशी कां सुचली ? ॥ ध्रु० ॥

लग्नापूर्वी स्वेच्छाचारी
विषयवासना करिती पूरी
ब्रह्मचर्य ही थट्टा झाली
पशुसम वृत्ती । म्हणजे ही नूतन नीती ॥ १ ॥

लग्नबंध हा जाचक वाटे
प्रेमाला त्या फुटती फांटे
एका ठायीं स्थिर ना कोठें
मधुकर-वृत्ती । म्हणजे ही नूतन नीती ॥ २ ॥

व्यक्तीचा ही करील ऱ्हास
विवाहसंस्था बुडविल खास
राष्ट्राचा मग होइल नाश
घातक वृत्ती । म्हणजे ही नूतन नीति ॥ ३ ॥

मुदतबंदिची रूढी पडतां
वेश्याही मग पतिव्रता त्या
नंतर कोणी नुरेल पतिता
वेश्यावृत्ती। म्हणजे ही नूतन नीति ॥ ४ ॥

परस्त्रियांशीं प्रेमालाप
करण्या वाटे बहु संतोष
घटस्फोट त्या देई वाट
पागलवृत्ती। म्हणजे ही नूतन नीती ॥ ५ ॥

धर्मभावना पार उडाली
नूतन नीती हातीं धरिली
परकीयांची घाण घेतली
सूकर-वृत्ती। म्हणजे ही नूतन नीती ॥ ६ ॥

भगवा झेंडा दूर फेकिला
त्यागवृत्तिचा त्यागचि केला
भोग भोगण्या सदैव सजला
भोगी वृत्ती। म्हणजे ही नूतन नीती ॥ ७ ॥

या नीतीनें होइल ऱ्हास
येइल ग्लानी मग धर्मास
स्वातंत्र्याची मग ना आस
प्रतापी ऐशी। ही नवी नीति नवलाची ॥ ८ ॥

— १३ —

# ऊठ बालका !

ऊठ बालका, दिशा फाकल्या पहाट रे झाली
निशा संपुनी अरुणोदयिंची लाल छटा आली १
वायू वाहे मंद मंद हा फुलें पहा फुललीं
बागेमध्यें सुवास भरला किति शोभा आली २
पक्षीगण हे उठुनि प्रभातीं वृक्षांवर बसुनी
परमेशाला अनन्यभावें आळविती गानीं ३
अंगण आपुलें सारवुनीया रंगवल्लिकांनी
भूषविती या ललना साऱ्या सत्वर बा उठुनी ४

दूध काढुनी गवळीजन हे. विकावया जाती
कुमार त्यांचे धेनु-वासरें वनामाजि नेती ५

जन हे सारे पहा निघाले अपुल्या कामाला
ऊठ राजसा, सकाळ झाली उशीर बघ झाला ६

सकाळची ही वेळ चांगली विद्या शिकण्याला
शिशुजन सगळा पाटया घेउनि शाळेमधिं गेला ७

'टिप्या' लाडका तुझा पहा हा दारीं येऊन
'बाळ नाहिं का अजून उठला?' पुसतो भोकून ८

बालमित्र हा अशोक आला संगें खेळाया
झोंप नाहिं का अझून सरली? ऊठ आतां राया ९

स्नान करोनी श्रीसूर्याला नमस्कार घाल
आरोग्याचा सद्बुद्धीचा वर तो देईल १०

देवासाठीं फुलें आण जा अशोकसमवेत
नैवेद्याचा लाडू तुजला देइन मी खास ११

* * *

बाळाची तों झोंप संपुनी बाळ होत जागा
मातेचें मग ऐकुनि सारें सुखवी मातेला १२

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंदणी क्र.
ता.
ग्रा. क्र.

— १४ —

# बाळ आणि फुलपांखरूं

बाळ गेला बागेंत खेळण्याला
रम्य शोभेनें दंग तिथें झाला
लता, वेली त्या दाटल्या सुमांनीं
वास त्यांचा राहिला दरवळोनी १

भ्रमर तेथें येवोनि दंग होती
पक्षिगण ते मंजूळ गान गाती
उडति तेथें फुलपांखरें मजेनें
बाळ पाही ही मौज कौतुकानें २

धरावें करीं पाखरूं एक छान
म्हणोनी पुढें तो करी हस्त सान
धरायासि त्यासी करी यत्न फार
परी पांखरूं जातसे दूर दूर ३

बहू हिंडुनी शीण आला तयासी
चिकाटी परी थोर त्या बालकाची
करी यत्न त्या पाखरासी धराया
झटोनी करी यत्न जाई न वांया ४

करीं मिळतांची मोद तया झाला
‘ कथें धलियेलें ? ’ म्हणे पांखराला

'अतां कोठें दाशील थांग पाहूं ?
कथा आतां उदशील बोल पाहूं ?' ५

बोल बाळाचे ऐकुनी दुःख होत
दीनवदनें मग वदत बालकास
'सोड बाळा, मज जाउंदे गृहास
वाट माता पाहील माझि खास ६

बाळ जाऊनी फार वेळ झाला
अजुनि परतेना कुठें बरें गेला !
कुणासंगें तो फार दूर गेला
कुण्या दुष्टें वा धरुनि त्यास नेला ! ७

कुठें पाहूं मी बरें त्यास आतां ?
अशी चिंता वाहील माझि माता
म्हणुनि सोडी तूं मला नको ठेवूं
रोज येथेंची भेट घेत जाऊं.' ८

'खला आहे पाखला, तुधा बोल
अतां दाई तूं मुलिं न लावि वेल
आइ माधोही कालदी कलील
लोद येथें येवोनि खेलुं खेल.' ९

असें बोलोनी सोडि पांखरास
मनीं मानी तो फार धन्यतेस
रोज जाई बागेंत खेळण्याला
तिथें भेटे तें पांखरू तयाला १०

— १५ —

# हरिजनांचा प्रश्न

दुष्ट ही रूढी। तोडून फेकुंया बेडी ॥ ध्रु० ॥

शेत राखण्या कुंपण केलें
तेंच तयानें पूर्ण व्यापिलें
झोंप घेउनी शांतपणानें
शेतकऱ्यानें। शेताचें जंगल केलें ॥ १ ॥

'धर्म, धर्म' या या नांवाखालीं
धिंगाणा ही रूढी घाली
धर्माची मग कळा लोपली
रूढिची सत्ता। धर्मावर बसती लत्ता ॥ २ ॥

सत्यधर्म तो लोप पावला
रूढिधर्म हा बनुनी गेला
तोडुनि आतां तिच्या शृंखला
जुलमी सत्ता। फेंकुनी देउंया आतां ॥ ३ ॥

आर्यधर्म हा पवित्र अपुला
पतित तयामधिं कसा राहिला ?
पावन कैसा नाहिं जाहला ?
दारें उघडा। रामाचें दर्शन घडवा ॥ ४ ॥

५६२२

पतीतपावन तो श्रीराम
दर्शन घडतां होतिल पावन
हरिजन भाई अपुले परम
दूर न लोटूं। आनंदें त्यांना भेटूं ॥५॥

उभारिलें जरि बंड तयांनीं
नसे तयांची अनुचित करणी
श्रेष्ठपणाचा तोरा मिरवुनि
तयांना अज्ञ। देखिलें पशूहुन हीन ॥६॥

अज्ञ जनांना सूज्ञ करावें
पतितां पावन सदा करावें
श्रीरामाचें भजन करावें
हाच उपदेश। समर्थें दीधला साच ॥७॥

मनीं धरोनी हा उपदेश
चला उद्धरूं हरीजनांस
ज्ञानामृतही पाजुं तयांस
नाहितर नाश। धर्मावर संकट खास ॥८॥

बांधव अपुले पांच करोड
पुरवूं त्यांचे जे जे कोड
लाऊं त्यांना आपुली ओढ
मोडुंया तेढ। होऊं द्या शेवट गोड ॥९॥

सं. काव्य न. ... ता. ... यवत... डा. मं.



— १६ —

## सांत्वन

हाय! दैवें संसारभंग झाला
ऐन समयाला घोर घात झाला
पूर्ण सौख्याला लावितांच ओंठ
हाय ! दैवें मारिली तुला लाथ ॥ १ ॥
असो, झालें तें होऽनिया गेलें
येत नाहीं तें जरी दुःख केलें
शोक सोडोनी धैर्य धरी आतां
जीव गेला तो नको करूं दुःखा ॥ २ ॥
जीव गेला त्यासवें तुला जाणें
मनीं आलें तरि शक्य नसे होणें
पुनः येइल ही मुळीं नसे आशा
तया नांवें कष्टणें न्याय कैसा ? ॥ ३ ॥
उमर अजुनी संसार करायाची
तुझी आहे ही सौख्य भोगण्याची
योग्य नसशी तूं वनीं जावयास
एकटयानें आयुष्य कंठण्यास ॥ ४ ॥
धैर्य धरुनी तूं मांड पुन्हां खेळ
शोध दुसरा तूं योग्य जोडिदार
नव्या उत्साहें नवा मांड डाव
जुन्या स्मरणें कष्टवूं नको जीव ॥ ५ ॥
ठाव आशेचा नको कदा सोडूं
निराशेच्या पंजरीं जीव कोंडूं
दुःख देते ही नेहमीं निराशा
सौख्यशिखरीं नेतसे पहा आशा ॥ ६ ॥

— १७ —

# भाऊगर्दी

घणघण शाळेची ही घंटा येई ऐकाया
तणतण करुनी भाऊ लागे घरांत नाचाया १

वणवण फिरुनी वेळ सकाळीं घालविला त्यानें
दणदण करुनी आतां म्हणतो शाळेला जाणें २

" पुस्तक माझें भूगोलाचें कुणीकडे गेलें ?
ताई माझें दप्तर कोठें ठेवुनिया दिधलें ? ३

सदरा माझा धुतला ना ? तो कुठें असे आई ?
सांगे लवकर होई मजला शाळेची घाई ४

कोट कोपरावरतीं सारा फाटुनिया गेला
ताई, का गे नाहीं शिवला? का न तुला दिसला? ५

टोपीवरतीं बाळयानें ही सांडियली शाई
आतां कैसा शाळेला मी जाऊं गे आई ?" ६

सदरा मळका घालुनि अंगीं, डोक्याला टोपी
दादांची मग ठेवुनि निघते भाऊची मूर्ती ७

लगबग करुनी धांवत धांवत जाई शाळेला
खदखद हंसती वर्गबंधु ते पाहुनिया त्याला ८

अंग चोरुनी भीत भीत मग आपुल्या जागेला
मान खालती घालुनि झटकन जाउनिया बसला ९

कोट फाटला म्हणुन घातला नाहीं अंगांत
परी खिशामधिं तशी राहिली पेन्सिल ती एक १०

अभ्यासहि तो करावयाचा राहुनिया गेला
खेळापुढतीं अभ्यासाची आठवण कोणाला ? ११

घंटा नाहीं नाहीं केला घरचा अभ्यास
पेन्सिल नाहीं शाळेमध्यें गणीत करण्यास १२

'शून्य' भोपळा मार्क लागला त्याचा त्या दिवशीं
बालबंधुंनो, भाऊगर्दी परिणामीं ऐशी १३

हिरमुसला मग भाऊ झाला त्या दिवशीं फार
मनीं म्हणे तो, 'गर्दी पुनरपि नाहीं करणार' १४

— १८ —

## तरुणास–

तरुणा, उठि आळस झटकून ॥ ध्रु० ॥

जुन्या काळच्या दुष्ट रूढिचा, धुव्वा दे उडवून १
सत्यधर्म जो लोपुनि गेला, काढि त्यास हुडकून २
जुन्यापुराण्या चालिरीतिंना, घेइ नीट पिंजून ३
प्रगतिपथीं जो रुते सराटा, देइ त्यास फेंकून ४
उन्नतिचा तूं मार्ग आक्रमी, टाक पुढें पाऊल ५
जग हें गेलें पुढें कितितरी, बघसि काय मुरडून ६
समाज मागें जरी राहतो, नेइ त्यास ओढून ७
अल्प यशानें, अल्प स्तुतीनें, जाउं नको हुरळून ८
बहूत निंदा जरी जाहली, जाउं नको करपून ९
मार्ग आपुला धिम्या दमानें, चाले धैर्य धरून १०
पुढिल जनांच्या पाहुनि ठेंचा, अक्कल घेइ शिकून ११
हिंददेविच्या कल्याणासी, घेइ तुला वाहून १२
अशा प्रयत्नें तुझा तूंच बा, भाग्योदय घेइ करून १३

— १९ —

# मातेची मार्गप्रतीक्षा

आई, लवकर ये परतून ॥ ध्रु० ॥

भूक लागली आम्हां पिलांना, दाणा आण टिपून १
पंख कोंवळे उडतां आम्हां, नाहीं येत अजून २
चोंचीमध्यें छोटे छोटे, कीटक आण धरून ३
मऊ बिछाना करण्यासाठी, चिंध्या घे जमवून ४
चाहुल कसलिहि अम्हां लागतां, जातों फार भिऊन ८
भीति जिवाला अशी वाटतां, बसतों मग बिलगून ६
चहूं बाजूला कुठें न दिसशी, गेलों आम्हि थकून ७
ऊन किती बघ भासुं लागलें, कंठ जाइ सोकून ८

— २० —

# ताईची फजिती

बालबंधुंनो, एक छोकरी ताई नांवाची
होति बोलकी हुषार तैसी गोड स्वभावाची १

एक खोड परि वाइट तिजला चोरुन खाण्याची
होती लागली किती बोलले तरी न जायाची २

भाऊ होता तिचा थोरला पुण्यास शिकण्याला
मे महिन्याच्या दिवाळिच्या तो येई सुट्टीला ३

येतांना तो कांहीं खाऊ आणी ताईला
आईपाशी डबा देतसे परि ठेवायाला ४

थोडा थोडा आई देई तिजला काढून
परी आणखी खात असे ती पुनरपि चोरून ५

आई सांगे, 'बाळ, खाशि तूं कशास चोरून ?
खाउ तुझा तो कोण खातसे दुसरा येऊन ?' ६

परी खोड ही तिची जाइना कांहीं केल्यानें
'युक्ति एक ही करून पाहूं आता गमतीनें' ७

विचार ऐसा करुनी भाऊ बाजारीं गेला
श्रीखंडाच्या वडया ताइला घेउनिया आला ८

वडया पाहुनी ताईला मनिं मोद फार होई
फडताळांतिल त्यांची जागा बघूनिया ठेवी ९

ताई निजली भाऊनें मग हळूच उठुनीया
श्रीखंडाच्या वड्या काढुनी डबा रिता केला १०

साबण कापुनि तुकडे त्याचे डब्यांत भरुनीया
जागेवरतीं डबा ठेवुनी झोंपी मग गेला ११

दुसरे दिवशीं दूध ठेवण्या फडताळापाशी
ताई गेली आठवण झाली गोड गोड वडिची १२

दूध ठेवुनी डबा उघडुनी वड्या काढुनिया
तोंडामाजी झटकन टाकी मागें बघुनीया १३

सडा टाकुनी आई आली आंतमधीं तोंच
भाऊ आला पूजा करण्या दारामधिं साच १४

वडिल उठोनी तोंड धुवोनी सोप्यावर आले
अरे, ताइचें तोंड कसेंसें होउनिया गेलें १५

वड्या चावल्या, गिळतां येना, जाया वाट नसे
तोंच ताइला ओकारी ये भाऊ खूप हंसे १६

" ताई, ताई, चोरी केली म्हणुन असें झालें
सोडुन देई आतां सगळे चोरीचे चाळे " १७

भाऊनें मग आपली युक्ती सारी सांगितली
पोट धरोनी आई दादा सुद्धां मग हंसलीं १८

तेव्हापासुन नाहीं खाल्लें कधींहि चोरून
अजून आम्ही हंसतों केव्हां फजिती आठवून १९

बालबंधुंनो, खाउं नका कधिं तुम्हीहि चोरून
कारण कधिं तरी बसाल ऐसे फजीत होऊन २०

— २१ —

## छोटूचें दुकान

चला सगळे मिळून । आतां दुकान दुकान खेळायचं ॥ ध्रु० ॥

मी दुकानवाला
तुम्ही घेणार व्हा
पैसे घेऊन तुम्ही इथं यायचं
धान्य मोजून तुम्हांस मी द्यायचं १

पेपरमिंटाचा डबा
आणला पहा नवा
गोड गोड लेमन् चाखायचं
पैसे देऊन तुम्ही मग घ्यायचं २

चिवडा ताजा खमंग
आहे फार संवग
थोडा तोंडांत टाकून तुम्हि पाह्यचं
खोटं नाहीं कधीं सांगायचं ३

चाकोलेटच्या वड्या
आणल्या बघ गड्या,
मधल्या सुट्टींत तुम्ही तें खायचं
मिटक्या मारीत घरीं मग जायचं ४

'साठे' बिस्कीट छान
देशी साखरेचा वाण
आपण देशीच हो सदा घ्यायचं
देशी धंद्यांस उत्तेजन द्यायचं ५

सुका मेवा तरी
आहे नानापरी
याला घरोघरीं तुम्ही न्यायचं
रोज खाऊन शक्तिवान् व्हायचं ६

दुकानदार तुमचा
मित्र जरी साचा
तरि उधार नाहिं मागायचं
पैसे देऊन तुम्ही सारं न्यायचं ७

---

— २२ —

# मुलास उपदेश

बा मुला, सांगतों तुला
भूषवी कुला
नीट धर ध्यानीं
पोखरूं तनू तूं नको दुष्ट व्यसनांनी १

पहांटे, डुलकि लागते
मोह पाडिते
उठुनि वेगानें
श्रीसूर्यास नमस्कार घाल नियमानें २

अभ्यास, करुनियां साच
परीक्षा पास
होइ नियमानें
स्वजनांस तोषवी वागुनीच नियमानें ३

ईश तो, जगा पाळितो
तया नम्र हो
ईश वश होई
अनन्यभाव सदा जो तयावरी ठेवी ४

ध्येय तें, गांठण्या झटे
हौस मग फिटे
आमच्या मनिंची
कीर्ति-शिखरावरीं पाहुनी उंच तुजसी ५

— २३ —

# सैनिकाचें स्वप्न

( A Soldier's Dream च्या आधारें )

रवी अस्ता जाउनी होइ सांज
नभीं लुकलुकती तारका सतेज
निशानाथाचें राज्य सुरू होई
रणीं कंदन तें पूर्ण बंद होई १

झडे नौबत ती रात्र विसाव्याची
वीर दमुनी येतात छावणीसी
कुणी शत्रूला पाजियलें पाणी
लढत असतां ठेविला देह कोणी २

' सूड घेऊं उद्यीक अतां याचा '
म्हणुनि कोणी झोंपला वीर साचा
श्वान, कोल्हे येतील मांस खाया
त्यांसि भिववाया अग्नि चेतवीला ३

उशी स्वकराची रक्तभूमि गादी
करुनि भक्तीनें युद्धदेवि वंदी
सुखें अंकित मी जाहलों निजेच्या
किती गोष्टी वदलों तिशीं मजेच्या ४

स्वप्न देखे मी एक फार रम्य
परि स्वप्नचि तें नव्हे सत्य हाय !
युद्धभूमीपासुनी एकलाच
दूर कोठें जात मी प्रभातींच ५

दिसे मम तातें केलि असे शेती
चरत पाडी आमुची एक होती
बहू गोंडस ती लाडकीच ‘ सोनी ’
मुदें आतांही हंबरे बघोनी ६

विळा घेवोनी शेतकरी शेत
मुदें कापीती गोड गाणिं गात
बहू हर्षानें पातलों गृहांत
मुलें पाहोनी कंठ रुद्ध होत ७

मिठी घालोनी हांक मारुनीया
म्हणति ‘ बाबा हो, खाउ आम्हां द्यावा ’

मित्र येताती क्षेम पुसायास
आप्तइष्टांना हर्ष फार होत ८

जिवाभावाची सखी भेटतांची
भरति येई त्या प्रेमसागरासी
अशा समयासी न ती काय यावी ?
अशी करणी अघटीत ईश दावी ९

रडूं येईना कंठ रुद्ध झाला
परी स्फुंदोनी वदत त्याच काला
'तनू विरहानें कशी पहा झाली
तव स्पर्शाच्या सुखा ही भुकेली १०

सख्या, आतां सोडुनी नका जाऊं
पुढें दोघे सौख्यांत दंग राहूं !'
अहा ! हर्षाच्या शिखरिं पोंचलों मी
जगीं नाहीं दूसरा धन्य कोणी ११

बिगुल वाजे इतुक्यांत पहाटेचा
भंग होई स्वप्नांतल्या सुखाचा
भास जावोनी सत्य पुढें ठाके
बिगुल वाजे द्यावया दुःख मातें १२

— २४ —

# आधुनिक सुशिक्षित

बी. ए. झालों। खर्चाला नाहक मुकलों ॥ ध्रु० ॥

रात्रीचा तो दिवस करोनी
तेल दिव्याचें व्यर्थ जाळुनी
अभ्यासासी लक्ष लावुनी
आरोग्याची। हेळसांड केली साची १

हपापलों मी पदवीसाठीं
पिता त्रासला खर्चासाठीं
परी सोडिली नाहिं चिकाटी
बी. ए. झालों। कर्जाला कारण बनलों २

बाजारीं मज किंमत येना
वीसालाही कुणी पुसेना
दाराशींही उभें करीना
बी. ए. चें तें। पीक बहुत आलें मोठें ३

हस्तकामही मुळीं येइना
धंद्यांमध्यें राम दिसेना
आरामाचें काम मिळेना
व्यर्थ उपाशी । मरणें हें दिसतें मजशी ४

अशिक्षीत तो कामें करितो
स्वतंत्रतेनें कमाइ करितो
संसाराचा गाडा हांकतो
सहज लीलेनें । बी. ए. ना कैसें जमणें ५

'पोझीशन' ही आडवी येते
धंदा करण्या लाज वाटते
मेहनतीचें काम जरी तें
अशक्तताही । शरिराची आडवी येई ६

'नो व्हेकन्सी' दारावरतीं
कायम पाटी लावुनि देती
फॉर्म छापुनी तयार असती
'नाहीं जागा'। अर्जांना उत्तर द्याया ७

आरोग्याची करुनी माती
द्रव्याची तर नाहीं गणती
अमोल आयू नासुनि वरतीं
बी. ए. झालों । सर्वस्वा व्यर्थचि मुकलों ! ८

— २५ —

# ईशपूजा

ईशपूजेचें । साधन हें आहे सोपें ॥ ध्रु० ॥
स्वकार्यतत्पर सदा असावें
कौशल्यानें कर्म करावें
कर्मफलाशारहितचि व्हावें
ईशपूजेचें । साधन हें आहे सोपें १
षड्रिपूंचा अवलुनि भारा
सत्संगाचा करितां मारा
कैसा राहिल त्यांचा तोरा ?
शुद्ध रहावें । साधन हें आहे बरवें २
ईश्वर आहे सर्वां भूतीं
जीवहि जितके तितक्या मूर्ती
नलगे जावें नाना-क्षेत्रीं
देव धुंडाया । खटपट ती जाइल वाया ३
'भक्ति'जलानें स्नान घालुनी
'प्रेम'वसनें तया पुसोनी
'स्वकर्म'- कुसुमें तया पुजोनी
कर्मफलाचा । नैवेद्यहि दावा साचा ४
ईशकार्य तें सदा करावें
'ईशतत्त्व' हें जगीं पहावें
ईशस्मरणीं सदा रमावें
ईशपूजेचें । साधन हें आहे सोपें ५

— २६ —

## मकरंद

भानु उदया ये लोपली निशा ही
तेज फाके उजळल्या दिशा दाही १

लता वेली त्या दाटल्या सुमांनीं
वास त्यांचा राहिला दरवळोनी २

कमलपुष्पें विकसती तलावांत
भ्रमर तेथें मकरंद सेवितात ३

मातृभाषेचा उदय होत आहे
वाङ्मयाची वाटिका फुलुनि राहे ४

रोज नाना ग्रंथ हे विकसतात
वृत्तपत्रें मासिकें शोभतात ५

त्यांत कांही अग्राह्य विकसणार
रसिक परि ते ' मकरंद ' सेवणार ६

— २७ —

# बालिकेस–

हांस हांस रम्य हास सतत बालिके,
होत मोद बहुत मला चारुचंद्रिके ॥ ध्रु० ॥

कुरळ केंस गौरवर्ण
डूल शोभवीत कर्ण
गोड गोड मजसि देइ बाळ, तूं मुके १

खेळ तुझे सहजगम्य
भासतात मजसि रम्य
विश्व सर्व विसरुनी बघत कौतुकें २

बोबडेच बोल गोड
लावितात मजसि वेड
बाळ, गोड बोल पुन्हां ऐकुं दे सुखें ३

चाल चाल पाय उचल
वाजतील मंजु चाळ
तळावतील नयन तंव बोंचुनी खडे ४

अंगावरि कितिक धूळ
भरलें हें चरणयुगुल
तरि तशीच उचलुनी घेइं मी कडे ५

निजतांना पाळण्यांत
आनंदें हालवीत
रिझवाया गाइं तुज गोड गीतकें ६

— २८ —

## चमेलीचें लग्न

मालती— बाहुली माझी। लग्नाला योग्यहि झाली

उद्इक आपण सर्व मिळून
करून टाकूं हिचेंच लग्न
नवरा मुलगा आणुं पाहुन
बी. ए. झाला। मिळतो बहु पगार ज्याला १

सुंदर आहे पहा चमेली
वर्गामध्यें असते पहिली
पेटीवादन कशिदा शिकली
गाते छान। घरकामहि करिते पूर्ण २

कुसुम— मजला आहे पसंत भारी
'सुरेश'चीही असे तयारी
हुंडयाची मम नाहिं भरारी
दोन हजार। करणीसह नाहिंत फार ३

नाहिं फारसा सुरेश मोठा
विद्येचा त्या नाहीं ताठा
आहे त्याला पगार मोठा
रुपये साठ। घरदारहि आहे नीट ४

केशव– असे चांगलें हें स्थळ ठरवा
असे उद्यांचा मुहूर्त बरवा
आम्हांलाही असे विसांवा
नाहीं शाळा। रविवारीं सुट्टी सकलां ५

रामू– लग्ना न्यावा ताशा अमुचा
बँडहि सुंदर आहे खासा
दिल्या सुपारी बोलवुं साचा
अमुचा संच। घेउं फक्त रुपये पांच ६

गोविंद– टांगा माझा असे तयार
रंग देउनी केला सुंदर
वरात न्याया येइन सत्वर
जोडुनि घोडा। तुम्हि तयाचि चिन्ता सोडा ७

मालती– माझीही मग असे तयारी
चिंता झाली सगळी दूरी
मैत्रीणींनो, करा तयारी
ठरलें लग्न। वधुवरांचि जोडी छान ८

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

— २९ —

# नूतन वधूवरांस आहेर

आला मंगल आजचा दिन, बहू ज्याची तुम्ही पाहिली
औत्सुक्यें बहु वाट, येउनि अतां तुम्हांस आनंदवी
गेला काल परी असेल गमला तुम्हांस तो निष्ठुर
नाहीं त्यास इलाज जाणुनि असे झालांत ना गंभिर ? १

आतां तो दिन पातला, परि विधी येती पहा आडवे
ऐसें त्यांस म्हणूं नका उभयतां, थोडयावरी पातलें
होई मंगल भेट आज तुमची धैर्यास सोडूं नका
आनंदें विधि सर्वही उरकतां, कां व्यर्थ हो लाजतां ? २

केली योग्य अशी खरी निवड ही कांहीं नसे वावगें
पोहा प्रेमभरें सुखें उभयतां संसार-दर्यामधें
देवो ईश्वर आयु दीर्घ, करवो सारें सुखी जीवन
दुःखाची झळही नसो, उभयतां राखा मनासी मन ३

आरोग्यास जपा, ऋणाइत नका होऊं कुणाचे कधीं
राखावें व्यसनां अलिप्त सगळया, प्रेमें असावें तुम्ही
ऐशा चार परी विचार करुनी संसार होतो सुखें
संसारांत मजा लुटा उभयतां, येई न तोटा कुठें ४

— ३० —

## माझी सायकल

सायकल आणली मला । आतां खूप खूप हिंडायचं ॥ ध्रु० ॥

आहे नवी कोरी
चाले भिरीभिरी
हिला नाहीं कधीं मळवायचं
रोज पुसून तेल मग द्यायचं १

साहेबि टोपी घालून
बूट पायीं चढवून
छाति पुढं काढून बसायचं
पाय ठेवून पॅडल् फिरवायचं २

भाजि मंडइची
खेप दुकानची
काम सारं मीच उरकायचं
शाळेलाही हिच्यावर जायचं ३

वाटेमधें जरी
कुणि येई तरी
मग पों पों असं दाबायचं
सायकल वळवून नाहींतर जायचं ४

जरि आली मोटार
तरि जाईन पार
परि नाहीं खालिं उतरायचं
मोटारिला कशासाठिं भ्यायचं? ५

तीन चाकं हिला
दोन बाबांचिला
हिला पंक्चर नाहीं कुठं व्हायचं
कोण पुढं जाईल मग पाहयचं ६

मित्र माझे तुम्ही
बसा कधीं कधीं
परि नाहीं कधीं भांडायचं
आपण गोडीमधें सदा राहयचं ८

— ३१ —

# मित्राचें स्वागत

मित्र जगताचा। उदया हा येई साचा ॥ ध्रु० ॥
उदयगिरीची सृष्टिदेवता
तांबुस शालू नेसुनि आतां
मंगल आरती करण्याकरितां
सिद्ध जहाली। लाल छटा चढली गालीं १
मेघमंडळें तांबुस झालीं
पीत छटाही त्यांत मिळाली
अनुपम तेजें सृष्टि शोभली
लाजुनि गेली। देहभावना नाहिं उरली २
मधुरालापें गायन करिती
पक्षीगण हे वृक्षांवरतीं
पुष्पलोचनें लता उघडती
हर्षित चित्तीं। आनंदें मोदें डुलती ३
सहस्रशा निजरत्नकरांनीं
सविता सर्वां कुरवाळोनी
आरोग्यातें देई तत्क्षणिं
मित्र जगताचा। उदया हा येउनि साचा ४
सन्मित्रांनो, निद्रा सोडुनि
उठुनी सत्वर स्नान करोनी
नमस्कार त्या सूर्या घालुनि
आरोग्याचा। ठेवा हा मिळवूं साचा ५

— ३२ —

# कवि आणि भ्रमर

कवी होता आराम स्वस्थ घेत
प्रियाविरहाचें आठवीत गीत
कल्पनेची तो मारुनी भरारी
रचूं लागे झरझरा काव्य भारी १
' पेन ' घेवोनी उतरणार तोंच
भ्रमर येई आपुलें गीत गात
गोड ताना घेतसे तो मजेनें
' रूम ' कविची पाहतो कौतुकानें २
किती चित्रें टांगलीं छान छान
किती ' बाडें ' अन् ठेविलीं लिहून
बघत होता सर्वही गात गात
क्रुद्ध कविसी देखिलें अकस्मात ३
' मनुज-मित्रा, तूं कोपलास काय ?
प्रियाविरहाचें करिसि काव्य काय ? '
असें गुंगत तो कवीकडे गेला
कवी होता आधीच तापलेला ४
काव्य त्याचें राहिलें लिहायाचें
तदा गेलें साम्राज्य कल्पनेचें
' ऊठ मूर्खा, जा बघूं अतां दूर
जात नाहीं ? पाहिजे तुला मार ' ५

असें बोलोनी घेत बाड हातीं
देत फटकारा एक तया पाठीं
भ्रमर पडला तो झणीं कोंपऱ्यांत
प्राण गोळा होउनी झाडि हात ६

' कवी मोठा तूं, तुझी कृती मान्य
काय केला अपराध तुझा सांग
गात होतों मी आपुला मजेनें
फिरत होतों मी इथें कौतुकानें ७

जगतिं काव्यें हीं असति काय थोडीं ?
तुझ्या काव्याची कुणा असे गोडी ?
परी हट्टानें करिसी काव्य-गान
तेंच केलें मी मला नसे मान ८

कवी मोठा तूं कुळीं मानवाच्या
जन्म माझा परि कुळीं कीटकांच्या
मनुजन्यायानें मी असेन हीन
ईशदरबारीं सर्वही समान ९

काय करिसी तूं लिहूनियां बाडें
आज सुटलें हें मला गूढ कोडें
बरें जातों मी अतां कवीराया,
विनति आहे परि एक तुझ्या पायां १०

नको छापूं मजवरी खंडकाव्य
नमन माझें घे ! ' निघुनि जाय जीव
प्रथम पृष्ठावर काव्यमासिकाचे
' मृत भ्रमरासी- ' काव्य ये कवीचें ११

---

— ३३ —

## बागेंत जाऊं या

चला जाऊं या ग चला जाऊं या
बागेमध्यें साऱ्या जणी मजा करूं या

बसूं येथें झोक्यावर
झोका नेऊं खूप वर
आनंदानें गाणें गाऊं झोंका घेऊं या १

खेळूं येथें लपंडाव
लपायासी बहू ठाव
एकमेका धरून आपण राज्य देऊं या २

मारूं दोरीवरतीं उडया
किंवा खेळूं झिम्मा फुगडया
आजीबाइची नक्कल कोणी आतां करूं या ३

शेवंती हा निशीगंध
मोगऱ्याचा वास सुगंध
गजरा त्यांचा अंबाडयांवर आपण घालूं या ४

पारीजाताचीं हीं फुलं
पडलीं पहा रानोमाळ
सुकून गेलीं आतां सारीं फेकुन देऊं या ५

मोगरा हा निशीगंध
तैशीं गुलाबाचीं फुलं
देवासाठीं ओटा भरुन आपण तोडूं या ६

तूळशीचीं पानं तोडूं
बेलाचींही पानं काढूं
जाईजुइच्या कळया सुद्धां आपण घेऊं या ७

सूर्य आतां जाइल अस्ता
खेळुन दमलों आपण आतां
ओटा भरून फुलं घेउन घरीं जाऊं या ८

---

५५२२

— ३४ —

# बालचन्द्र

दिनकर दमुनी संध्या-सदनीं जात विसाव्याला
चंद्र धाकटा बंधू त्याचा डोकावी त्याला १

थोर माणसें नसतां नसतो बालांना धाक
दंगल करिती खेळ खेळती मोदें मोकाट २

बंधु थोरला गेला बघुनी मोद तया झाला
प्रफुल्लतेनें उत्सुकतेनें लागे खेळाया ३

सृष्टी हंसली फार शोभली शुभ्र पातळानें
शुभ्र मनोहर प्रभा फाकली रात्र गात गाणें ४

मेघांचा पसरिला गालिचा वरी चंद्र खेळे
मेघ-सागरावरतीं चेंडू जणूं काय उसळे ५

घोडा घोडा करुनी मेघांवरतीं हा बसतो
ताऱ्यांसंगें खेळ खेळतां त्यांमागें लपतो ६

चंद्र बघोनी सान बालकां होतो आनंद
‘ चांदा, चांदा, टोपी देई ’ देताती साद ७

शुभ्र चांदणें मोहक त्याचें रुचतें सर्वांना
सान बालकें मधुर हांसती सुखवित ना कोणा ? ८

गणेश पडतां बालस्वभावें हसूं त्यास येई
रामप्रभूला वेड लावुनी तसेंच तो रडवी ९

खेळ खेळतां बंधू उद्या येतो देखोनी
मान खालतीं घालुनि झटकन जाई हा पळुनी १०

धांवत धांवत जाउनि बिलगे अपुल्या मातेला
सागर-माता त्याची लपवी पदरामधिं त्याला ११

अपुल्या खोलीमध्यें कोणी केला धुडगूस
पाहुनि सूर्या येई तेव्हां फारच संताप १२

संतापानें बघत चहुंकडे होऊनी लाल
मातेपाशीं खुशाल बसला चांदोबा बाळ १३

---

— ३५ —

# एका जलबिंदूचा प्रवास

पर्वत होता उत्तर-देशीं उंच एक फार
दरीमधूनी झरा स्वच्छसा वाहे झुळझूळ १
तिथें जन्मलों वाहुं लागलों प्रवाह तो नेई
तिकडे जाणें भाग पडे मज दुजी गती नाहीं २
मित्र कितितरी माझ्यासंगें जरी पुढें पळती
तरी एकही शब्द बोलण्या नाहीं विश्रांती ३
क्षणांत जमतों, दूरहि जातों, क्षणांत उधळोनी
गिरक्या, खातों, बुडया मारतों येतों उसळोनी ४
असें चक्र हें सदा चाललें कैसें बोलावें ?
क्षणहि न पुरता मित्र एकही मम संगें राहे ५
गप्पांमध्यें मित्र कांहिं जे गुंतोनी गेले
मागें पडुनी मातीशीं मग मिळूनिया गेले ६
पुढतीं जावें देश पहावे मला फार हौस
म्हणुनी नाहीं कुठें गुंतलों कधीं बोलण्यास ७
उंच उंचशा कडयावरोनी उडया टाकतांना
मोठया मोठया धोंडयांनाही टक्कर देतांना ८
गांगरून मी नाहीं गेलों धीर खूप धरला
'धीर न धरती गोते खाती' ठावें हें मजला ९
मोठीं मोठीं वळणें घेउन डोंगर उतरून
खालीं आलों वाहुं लागलों सपाट भूवरुन १०

प्रवाहसंगें खालीं आली वाहुन संपत्ती
पसरुन दिधली शेतांवरतीं डोंगरची माती ११
मित्रांचा तो अपार झाला आतां परिवार
आहे कोणी गणिती त्यांची गणती करणार ? १२
जागोजागीं कितीक मिळती पुन्हां पुन्हां मित्र
ध्येय पाहुनी पुढें धांवणें करतों मी मात्र १३
नूतन मित्रांसवें बोलण्या कोणी थांबेल
पडेल मागें भू-माता त्या अडवुनि ठेवील १४
नाहीं उरली पूर्वीची ती पळण्याची घाई
आतां सरिता संथपणानें हळू हळू जाई १५
शैशवपणिंची अवखळता ना थोरपणीं राहे
किंवा भांडें भरलें त्याचा नाद कधीं नोहे १६
दुथडीं पाणी गच्च भरोनी वाहे ती शांत
उभय तिरांना किती बांधले लोकांनीं घाट १७
शांतपणा जरि मला मिळाला तरि येई काम
थोरपणीं ना कधींही द्यावा जीवा आराम १८
वसनें, भांडीं, तसें अंगही स्वच्छ करायाचें
होडया नावा खांद्यावरतीं घेउन जायाचें १९
जरी काम हें पडलें तरिही ध्येयावर दृष्टी
सदा ठेवुनी मार्ग तयाचा पुनरपि मी कंठीं २०
सुंदर ललना कितीक येती भांडीं घेऊन
आम्हां न्याया त्यांच्या गेहीं करण्यासी काम २१
डोईवरतीं, कमरेवरतीं, हातामधिं कोणी
आम्हां घेती परी तुडविती आधीं पायांनीं २२

रमणिजनांच्या सौंदर्यावर जरी लुब्ध झालों
असतों मीही घरीं तयांच्या नसतों का गेलों ? २३
परी घाट मी नाहीं धरला त्यांना मोहून
मधला रस्ता कायम केला गति ही पाहून २४
अम्ही मित्र हे मधले सारे जातों वेगानें
घाटाकडचे घुटमळताती ललनामोहानें २५
मित्र बाजुचे नसला जरि तो कांठाला घाट
निसर्ग-शोभा पाहुनि वेडे दंग तिथें होत २६
शेतें, बागा, शहरें, खेडीं गेलीं तीं मागें
दृष्टि न पडली उगा निघालों वाटेनें वेगें २७
देश पहावा हेतू हा परि देश नाहिं दिसला
मेघावरतीं बसुनि फिरावें हेतू मनिं आला २८
वरतीं नसती दऱ्या कडे वा मोठालीं वळणें
टक्कर घ्याया नसती धोंडे नसे कुठें बुडणें २९
मेघावरुनी दिसेल सारा देशहि मज छान
परी जायचें तिथें कसें मी ? पडला हा प्रश्न ३०
वैमानिक का नेइल मजला कोणी येऊन ?
नेउन वरतीं देइल मेघावर का सोडून ? ३१
विचार ऐसा करतों तों मी समुद्रांत आलों
अफाट सागर पाहुनि तेव्हां भांबावुन गेलों ३२
मित्रांना तर तिथें मुळींही नसे पहा गणती
आनंदानें उत्साहानें सारे बागडती ३३
खूप खेळलों, खूप हिंडलों मौजेनें येथें
क्षारपणा ही उणीव एकच भासे मज तेथें ३४

जलचर प्राणी असंख्य नमुने मिळती बघण्याला
मौक्तिक-रत्नें तळास पडलीं जणुं ढीगच केला ३५
रत्नाकर हें नांव ठेविलें योग्य तया सार्थ
रत्नांचा पसरिला गालिचा खरोखरी येथ ३६
ध्येयाच्या जो शिखरीं चढतो होतो कंगाल
ध्येयच्युत जो गळयांत त्याच्या लक्ष्मीची माळ ३७
कैलासावर शंकर पोचे झाला कंगाल
क्षारसागरीं लक्ष्मी घेई झोंप सर्वकाल ३८
ध्येयनिष्ठ परि त्याची कीर्ती होते या जगतीं
कीर्तिचंद्रमा शुभ्र विलसतो शंभुशिरावरतीं ३९
कीर्ति आपुली व्हावी ऐसें जरी कुणा वाटे
तरी तयानें ध्येय गांठण्या झटावेंच नेटें ४०
लक्ष्मीची मग इच्छा त्यानें धरूं नये तेव्हां
लक्ष्मी मिळते ध्येयापासुनि खालीं ये जेव्हां ४१
असो बोध हा पुरे जहाला वर्णन सफरीचें
तसें राहिलें बोधप्रसंगें दिपलें मन साचें ४२
रहात होतों समुद्रांत मी मोठया ऐटींत
लाटांवरतीं बसुन मजेनें झोकेही घेत ४३
एके दिवशीं खेळत होतों मौजेनें तोंच
हलका झालों जाउं लागलों आकाशीं उंच ४४
वैमानिक हा नेइ कोणता मातें समजेना
विमान त्याचें किंवा तोही कोठें गवसेना ४५
विनाप्रयासें आकाशीं मी जातों पाहून
हर्ष मानसीं फार जाहला होइ हेतु पूर्ण ४६

मित्रमंडळी होती भंवतीं आतांही भरली
वाऱ्यासंगें इकडे तिकडे खाती झोकेंही ४७
उंच उंच मी गेलों वरतीं मेघावर बसलों
पुढतीं गेलों देश पाहिले किती किती फिरलों ४८
वाटेमध्यें पर्वत येती आम्हां अडवाया
वृक्षलताही प्रेमभरानें म्हणती 'खालीं या' ४९
मित्र भुलोनी निसर्गशोभें खालीं जे गेले
जड होवोनी भूवरतीं वा नद्यांमधें पडले ५०
फिरत फिरत मी गेलों होतों खूप खूप लांब
छोटासा परि रम्य देखिला तिथें एक गांव ५१
सुंदर होती एक बंगली तिच्या पुढें बाग
मुलें खेळतीं आनंदानें झाला बहु मोद ५२
एक छोकरी बोलावितसे हात हालवून
'पावूथा खालीं येथिल तलि मी पैथा देईन' ५३
बोल बोबडे ऐकुनि झाला मनीं फार मोद
मित्रांसंगें मीही दिधलें टाकुनियां अंग ५४
आम्ही आलों बघुनी तिजला मोद फार झाला
धांवत धांवत सांगाया मग गेली मातेला ५५
बागेमध्यें गुलाब फुलला तयाजवळ पडलों
जिरुनी तेथें झाडामधुनी वरतीं मग चढलों ५६
एके दिवशीं कलिकेमाजीं शिरून मी बसलों
फूल उमलतां चवथे दिवशीं आनंदित झालों ५७
दीपावलिचा आनंदाचा सण होता आला
मंगल स्नानें, दारु उडविणें हर्ष फार झाला ५८

भाउबिजेचा दिवस म्हणोनी भगिनिवर्ग दंग
झाला होता बंधुसुखाचा बांधुनिया चंग ५९
पुष्प तोडुनी बाला मग ती भाऊच्या हातीं
देउन वदते ' भाऊ, शोभे बघ कोतावलतीं ' ६०
' नको सुशे ग, घाल तुझ्या तूं हें वेणीवरतीं
लुडबुडते जी इकडे तिकडे तव पाठीवरतीं ' ६१
असें बोलुनी भाऊनें मग फूल खोवुनीया
गालावरतीं चापट दिधली हळूच हंसुनीया ६२
प्रेम तयांचें पाहुन मजला मोद फार झाला
पुष्प देतसे शोभा अतिशय काळ्या वेणीला ६३
आतां उदयिक येथुन पुढतीं ढगांत जाणार
परी प्रवाहीं पुन्हां कदापी नाहीं पडणार ६४
प्रवाहपतिता स्वातंत्र्याचा लाभ नसे होत
प्रवाह नेइल तिकडे जाणें त्यास असे प्राप्त ६५
काम कराया फार लागतें चीज होत नाहीं
घाण तेवढी बक्षिस मिळते वरतीं कोठेंही ६६
म्हणुनी आतां नको पुन्हां तें प्रवाहांत पडणें
मेघावरचें स्वातंत्र्याचें बरें असे जगणें ६७
देशाटन मी करून इतकें, बोधसुधा गोळा
केली ऐशी, ध्यानीं धरुनी वागा जगतीं या ६८

— ३६ —

## ईश्वराची योजना

( George Herbert च्या ‘ The Pully ’ चा भावार्थ )

मनुज ईशें हा जधीं निर्मियेला
तधीं इच्छी त्या सर्व द्यावयाला
सिद्ध झाला शक्य तें द्यावयास
देत आनंदें सर्वही वरांस १

रूप, विद्या, बल, मान, सूख ऐसे
पांच दिधले वर मनुष्यास ईशें
अतां ‘ शांती ’ ही एकलीच राही
असें पाहोनी ईश उगा राही २

'जरी शांती ही दिली मानवांस
मला सोडोनी मानितील त्यांस
सर्वदाता मी मला विसरतील'
असें वाटे ईशासि खरा बोल ३

'सर्वकर्त्यासी कुणी नोळखील
देव-मनुजांचा स्नेहही तुटेल
म्हणुनि 'शांती' ही नको त्यांस द्याया
दिली त्यांना मी इतर सर्व माया ४

'अता भोगूं दे भोग सावकाश
परी शांतीचा लाभ नसे लेश
मला कर्तव्यें जरी नाठवीत
अशांतीनें तो मला आठवील' ५

ईश्वराची योजना फार छान
परी कर्तव्यें करी ईशध्यान
ईशध्यानें ती शांतिही मिळेल
ईशभक्ती तूं करीं सर्व काळ ६

— ३७ —

## स्त्री-दाक्षिण्य

कशी फेकते पायचाकी पहा
कशी शोभते ती पहा सुंदरी
श्रमानें बघा लाल झाला मुखेंदू
उभे घर्मबिंदू कपोलावरी १

असे सैल वेणी तिनें घातली
डावीकडे भांग शोभे कसा
रुळे शेपटा वामखांद्यावरी
हाले जसा नाग डोले तसा २

नाजूक बाहू परी मांसल –
 निळया पातळें अंगकांती खुले
केला वरी तोंच डावा कर
 तिनें पाहण्यासी किती वाजले ३

हातांतुनी तों पडे कांहिंसें
 गेला तिथें मित्र धावूनिया
केली उभी पायचाकी तिनें
 हातांतला ब्रेक दाबूनिया ४

गाडी खडी राहतां बोलला
 'द्यावी मनीबॅग ही आपली'
परी क्रुद्ध होई तदा सुंदरी
 तयें दृष्टि पायांकडे लाविली ५

'निर्लज्ज कैसे तुम्ही जाहला ?
 आम्हां बघोनीच घोटाळतां ?
कॉलेज–कन्या पथीं पाहुनी
 दाक्षिण्य सारे तयां दावितां ? ६

'मनीबॅग घेण्यासी माझे कर
 गेले न कोठें तुला दावुं का ?
'दाक्षिण्य' रे तूं मुळीं नेणसी
 दावावया ऐट जाशी फुका ७

मराठी ग्रंथ संग्रहालय
सं. ....... नं. .......
ठाणे.

करूं रे नको व्यर्थ चाळा असा
करीं साह्य ज्यांना जरूरी असे
अनाथालयें कैक द्रव्याविना
बुडूं लागलीं तें तुला ना दिसे ८

जाई अतां तूं निघोनी त्वरें
उल्लूपणा ठाव देऊं नको '-
नमूनि तिला तो तदा बोलला-
' ताई, अतां व्यर्थ बोलूं नको ९

' आहे खरी चूक माझ्याकडे
तुला दोष त्याचा नसे कांहिंही
क्षमा तूं करी याचना ही तुला
बोलूं नको आजची गोष्ट ही ' १०

' चिंता नको व्यर्थ त्याची तुला
आम्हां मुलींना नसे खोड ही '
असें बोलुनी पायचाकीवरी
गेली निघोनी तदा सुंदरी ११

आम्हांकडे मित्र आला परी
खालीं उभा मान घालूनिया
बोले न कांहीं विचारीं दिसे
पुशीलें न आम्हीहि खोदूनिया १२

— ३८ —

## खेळूं मैदानीं

या रे या रे या मैदानीं
मौजेनें खेळोनी
सगळे जण आतां एकमतें
रमवूं या चित्तातें १

रंगित विटिदांडू सुंदर
घेउनिया रघुवीर
धांवत हा आला, तुम्ही या
आपले भिडु निवडाया २

क्रिकेट, फुटबॉल, हॉकीचा
किंवा पळावयाचा
घेऊं व्यायाम, लंगडिचा
खेळूं खेळ मजेचा ३

खोखोचा खेळ खेळूं या
किंवा आटयापाटया
देती व्यायाम शरिराला
होई श्रम सकलांला ४

दिनकर अस्ताला जाईल
रात्र पडूं लागेल
तोंवर खेळूं या आपण
घेऊं या व्यायाम ५

— ३९ —

# दिपवूं या जगता–

हिंद्बंधुंनो, परवशतेचा तोडोनी पाश
यत्न करोनी स्वतंत्र होऊं, हीच धरूं आस १

' नश्वर जग हें ' असला दुबळा सोडूं वेदान्त
वृद्धांनी जो सदा जपावा अपुल्या चित्तांत २

तारुण्याचा जोम् जयाच्या अंगीं रसरसतो
रक्त जयाचें सळसळ उसळे त्याला का रुचतो ? ३

विज्ञानाची कांस धरोनी केली ही क्रांती
पाश्चात्यांनी बघतां बघतां किति केली प्रगती ४

परवां परवां मागें असतां किती पुढें घुसले
इथें येउनी आम्हां जिंकुनि राजे हे झाले ५

फंद्फितूरी बद्नेकीचा हाची परिणाम
तसाच गेला रूढीखालीं चेपुनिया धर्म ६

सोडुन देऊं जुन्या कल्पना, रूढींचे पाश
तोडुन टाकूं तटतट सारे गुंडाळूं शास्त्र ७

जग हें गेलें पुढें कितितरी आपणही जाऊं
त्यांना गाठूं हिंमत धरुनी मागें ना राहूं ८

ऐहिक गोष्टी साधुनि आधीं, स्वर्गाच्या बाता
नंतर मारूं करमणुकीला बऱ्या असति वार्ता ९

दुर्व्यसनांना हांकलुन देऊं कमवूंया शक्ती
व्यायामानें उच्च कृतीनें मिळवूंया कीर्ती १०

भेद्भाव ते गाडुनि टाकूं होऊंया एक
एकदिलानें राष्ट्रोद्धारा करूं चला यत्न ११

सत्य, अहिंसा, दीनांवरतीं दया पूर्ण करणें
दयाशीलता, स्वकर्मरतता, गर्व मुळीं नसणें १२

पतितांलागीं पावन करणें, ज्ञान तयां देणें
मुख्य लक्षणें अशीं जयाचीं 'धर्म' तया म्हणणें १३

या धर्माचा प्रसार करुनी स्थापूंया समता
भारतभूचा उभवूं झेंडा दिपवूं या जगता १४

— ५० —

## श्रीरामचंद्राचें धोरण

करीं मी जरी वागवीं चाप-बाण
तरी ना मला वाटतो अल्प शीण
प्रजेला सुखी ठेवणें हाच ध्यास
स्वतःची सुखाशा शिवेना मनास १

स्वयें दुष्टदंडार्थ धांवोनि जावें
अशा संकटीं ना कधींही दडावें
प्रजेनें म्हणावेंच ' आदर्श राजा
अम्हां लाभला ' हा असे हेतु माझा २

[illegible]
तयाचा पुरा फायदा शत्रु घेत
घरीं भांडणें पाहुनी ये घरांत
करी राज्य सर्वांवरी तो मजेत ३

पित्याचें जरी ना मिळे वांटणीनें
दुजें राज्य जिंकू रणीं विक्रमानें
रणीं शत्रुला बांधुनी चारूं धूळ
परी आंत येण्यासि देऊं न बीळ ४

लढाई न द्यावी स्वतःच्या प्रदेशीं
न द्यावा मुळीं त्रास शत्रु-प्रजेसी
रिपूची प्रजा देतसे धन्यवाद
टिके राज्य तें देइ सर्वांस मोद ५

अशा धोरणें भारतीं काम केलें
पिता, मित्र, बंधू, गुरू तोषवीले
प्रजा-निंदिता पत्निचा त्याग केला
असे एक हा डाग माझ्या यशाला ६

५६२२

समाप्त

REFBK-0005622
REFBK-0005622

कदा द्वेष ना वाढवावा घरांत
तयाचा पुरा फायदा शत्रु घेत
घरीं भांडणें पाहुनी ये घरांत
करी राज्य सर्वांवरी तो मजेंत ३

पित्याचें जरी ना मिळे वांटणीनें
दुजें राज्य जिंकूं रणीं विक्रमानें
रणीं शत्रुला बांधुनी चारूं धूळ
परी आंत येण्यासि देऊं न वीळ ४

लढाई न द्यावी स्वतःच्या प्रदेशीं
न द्यावा मुळीं त्रास शत्रु-प्रजेसी
रिपूची प्रजा देतसे धन्यवाद
टिके राज्य तें देइ सर्वांस मोद ५

अशा धोरणें भारतीं काम केलें
पिता, मित्र, बंधू, गुरू तोषवीले
प्रजा-निंदिता पत्निचा त्याग केला
असे एक हा डाग माझ्या यशाला ६

५६२२

समाप्त

REFBK-0005622
REFBK-0005622

-माझी-

छोटीशी, ध्येयपूर्ण, राजकीय व सामाजिक प्रश्नांची

चर्चा असलेली

कादंबरी

# प्रभातकाल

लवकरच

प्रसिद्ध होईल.

आधीं नांवें नोंदवणारास ट. खर्च माफ.

पत्ता—

नरहर विष्णु फडके,

यवत ( जि. पुणें )

—( भारत-मुद्रणालय, औंध )—